साप्ताहिक

''एकच ध्येय... एकच आवाज''

PRGI No. MAHMAR / 25 / A5304
पोस्ट परवाना नं. : DHL/642/2026-28

# प्रजा न्याय

संपादक – संजय अण्णा कुसळकर

Mob. : 9422798093 / 9028136953
Email - kusalkars@gmail.com
prajanyay@gmail.com

वर्ष-१ले | अंक ३१ वा | सोमवार, दि. १७/०८/२०२६ ते दि. २३/०८/२०२६ | पाने ४ | किंमत ३ रुपये

# जिल्हाधिकारी कार्यालयात ८०वा स्वातंत्र्यदिनी पणन व राजशिष्टाचार तथा धुळे जिल्हा पालकमंत्री ना.जयकुमार रावल यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण सोहळा संपन्न

धुळे (जिमाका) – भारताच्या ८०व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त धुळे जिल्ह्यात राष्ट्रभक्ती, विकासाची दिशा आणि सामाजिक बांधिलकी यांचा संगम पाहायला मिळाला. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात आयोजित मुख्य शासकीय स्वातंत्र्यदिन सोहळ्यात जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार जयकुमार रावल यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकविण्यात आला. राष्ट्रध्वजाला मानवंदना देत उपस्थितांनी देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन केले. स्वातंत्र्यदिनाच्या या सोहळ्यात केवळ राष्ट्रध्वजारोहणापुरता कार्यक्रम मर्यादित न राहता धुळे जिल्ह्याच्या आगामी विकासाची दिशा स्पष्ट करण्यात आली. शेतकरी, सिंचन, पायाभूत सुविधा, रेल्वे, औद्योगिक गुंतवणूक, रोजगार, पर्यावरण आणि जलसंधारण या क्षेत्रांमध्ये सुरू असलेल्या तसेच प्रस्तावित विविध योजनांचा आढावा यानिमित्ताने समोर आला. त्यामुळे यंदाचा स्वातंत्र्यदिन धुळे जिल्ह्यासाठी विकासाच्या नव्या पर्वाचा संकल्प अधोरेखित करणारा ठरला.

नविन जिल्हाधिकारी कार्यालयाचे बांधकामाचे भुमीपुजन करण्यात आले, तसेच शिक्षण महर्षी दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन, धुळे संस्थेच्या ग्रंथालय इमारतीचे उदघाटन करण्यात आले. जिल्ह्यातील शेतकरी हा विकासाचा केंद्रबिंदू असल्याचे स्पष्ट करत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या पहिल्या टप्प्यात धुळे जिल्ह्यातील ९ हजार २० शेतकऱ्यांच्या खात्यावर ८९ कोटी ७४ लाख रुपयांची रक्कम वर्ग करण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली. यासोबतच चालू खरीप हंगामात ३१ हजार ९२८ शेतकऱ्यांना ४४८ कोटी रुपयांचे पीक कर्ज वितरित करण्यात आले आहे. शेतीसाठी आवश्यक भांडवलाची उपलब्धता वाढवून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या दृष्टीने या कर्जवाटपाला महत्त्व आहे. कर्जमुक्ती आणि पीक कर्जवाटपाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिलासा देतानाच सिंचनाची उपलब्धता वाढविण्यावरही शासनाकडून भर दिला जात असल्याचे चित्र आहे.

धुळे जिल्ह्याच्या शेतीचे भवितव्य मोठ्या प्रमाणात सिंचन प्रकल्पांशी जोडलेले आहे. या पार्श्वभूमीवर सुलवाडे-जामफळ-कनोली उपसा सिंचन योजनेचे सुमारे ८० टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती महत्त्वाची ठरली आहे. हा प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यानंतर मोठ्या क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळण्याची अपेक्षा आहे. पांझरा नदीवरील अक्कलपाडा प्रकल्पाची पूर्ण क्षमतेने पूर्तता करण्यासाठी आवश्यक भूसंपादन प्रक्रियेलाही गती देण्यात येत असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. सिंचन क्षमता वाढल्यास शेती उत्पादनात वाढ, पीक पद्धतीत बदल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे या प्रकल्पांकडे केवळ पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने नव्हे, तर जिल्ह्याच्या दीर्घकालीन आर्थिक विकासाच्या दृष्टीने पाहिले जात आहे.






## शेतकरी, सिंचन, उद्योग, रेल्वे व रोजगाराला गती देण्याचा निर्धार

धुळे जिल्ह्याच्या औद्योगिक आणि व्यापारी विकासासाठी रेल्वे कनेक्टिव्हिटीला विशेष महत्त्व आहे. मनमाड-इंदूर रेल्वे मार्ग तसेच प्रस्तावित बोरविहीर-नरडाणा रेल्वे मार्गाच्या कामांना गती देण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. रेल्वे मार्गांचा विस्तार झाल्यास धुळे जिल्ह्याला मोठ्या बाजारपेठांशी अधिक प्रभावीपणे जोडण्याबरोबरच मालवाहतूक, उद्योग, कृषीमालाची वाहतूक आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे आगामी काळात रेल्वे प्रकल्प जिल्ह्याच्या आर्थिक विकासातील महत्त्वाचा घटक ठरू शकतात. औद्योगिक विकासाच्या दृष्टीने जिल्हा गुंतवणूक परिषदेतून ८ हजार कोटी रुपयांहून अधिक गुंतवणुकीचे सामंजस्य करार झाल्याची माहिती देण्यात आली. या गुंतवणुकीतून सुमारे १३ हजार ५०० रोजगारनिर्मिती अपेक्षित असल्याचे सांगण्यात आले. दोंडाईचा येथील टेक्स्टाईल पार्क आणि औद्योगिक विस्ताराला चालना देण्यावर भर देण्यात येणार असल्याचे नमुत करण्यात आले. विकासासोबत पर्यावरणाचा समतोल राखण्याचा संदेशही स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमातून देण्यात आला. धुळे जिल्ह्यात यंदा २१ लाख ६० हजार वृक्षलागवडीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. वृक्षलागवड केवळ अभियानापुरती मर्यादित न ठेवता त्यांचे संवर्धन आणि संगोपन करण्याची गरजही यानिमित्ताने अधोरेखित झाली. तसेच स्व. सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त २१ ऑगस्ट रोजी जलसंधारण दिवस साजरा करण्याची तयारी करण्यात आली आहे. पाणीटंचाई, भूजलपातळी आणि शेतीसाठी उपलब्ध पाण्याचा प्रश्न लक्षात घेता जलसंधारणाच्या उपाययोजनांना भविष्यात अधिक व्यापक स्वरूप देण्याचा प्रयत्न अपेक्षित आहे.

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा कार्यालय आणि विविध शासकीय विभागांच्या माध्यमातून विकासकामे, प्रशासकीय सुविधा आणि जनोपयोगी उपक्रमांचे उद्घाटन करण्यात आले. स्वातंत्र्यदिनाच्या उत्साहाला सामाजिक बांधिलकीची जोड देत भारतीय जनता पार्टी धुळे महानगर, ए.बी. फाउंडेशन, धुळे आणि लायन्स क्लब, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. नगरसेवक ललित माळी यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला नागरिक, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रक्तदान हे केवळ सामाजिक उपक्रम नसून आपत्कालीन परिस्थितीत गरजू रुग्णासाठी जीवनदायी ठरणारे कार्य आहे. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने रक्तदान करून समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. देशाच्या स्वातंत्र्यासाठी शूरवीरांनी दिलेल्या बलिदानाची आठवण ठेवत आजच्या काळात समाजासाठी उपयोगी ठरणारी सेवा करणे, हाही देशभक्तीचाच एक भाग असल्याची भावना या शिबिरातून व्यक्त झाली. मुख्य स्वातंत्र्यदिन सोहळ्यास आमदार अनुप अग्रवाल, आमदार राघवेंद्र (रामदादा) भदाणे, महापौर मायादेवी परदेशी, माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे, माजी आमदार कुणाल पाटील, भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र शेठ अंपळकर, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, पोलीस अधीक्षक विशाल आनंद, महापालिका आयुक्त नितीन कापडणीस यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवसेना ओबीसी बारा बलुतेदार विभाग पुणे जिल्हाध्यक्षपदी दत्ता कर्चे यांची निवड



मुंबई– शिवसेना ओबीसी बारा बलुतेदार विभागाचे राज्य संपर्क प्रमुख अनिल धमने पाटील आणि सोशल मिडीया राज्यप्रमुख संजय कुसळकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवळे आहे की, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते तथा महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्य मंत्री एकनाथ भाई शिंदे यांच्या आदेशानुसार व शिवसेनेचे मुख्य सचिव संजय मोरे, खा. डॉ. श्रीकांत शिंदे, प्रशांत पालांडे, यांच्या मागदर्शनाखाली ओबीसी नेते तथा शिवसेना ओबीसी बारा बलुतेदार विभागाचे प्रदेशाध्यक्ष ॲड. डॉ. पी.बी. कुंभार यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना ओबीसी बारा बलुतेदार विभाग पुणे जिल्हाध्यक्ष (कार्यक्षेत्र – बारामती, पुरंदर, वेल्हा आणि हवेली) पदी दत्ता कर्चे यांची नियुक्ती पत्र प्रदेशाध्यक्ष ॲड. डॉ. पी.बी. कुंभार यांच्या सही निशी देण्यात आले असून या नियुक्ती पत्रावर वंदनीय हिंदू हृदय सम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण याचा आपण सक्रियपणे प्रचार प्रसार कराल व तसेच शिवसेना पक्ष वाढीसाठी आपण सर्व घटकांना सोबत घेऊन संघटन वाढवून कार्य कराल असा विश्वास व्यक्त करूण आपणास पुढील कार्यास शुभेच्छा देतीत असा उल्लेख नियुक्ती पत्रात केलेला आहे या निवडी बद्दल पुणे जिल्ह्यातील पदाधिकारी, शिवसैनिकांनी निवनिर्वाचित पदअधिकारी त्यांच्यावर शुभेच्छा चा वर्षाव केला जात आहे.

# माती वाचवा... पाणी जपा... सुरक्षित भविष्य घडवा...

महाराष्ट्राच्या विकासाच्या वाटचालीत माती आणि पाणी या दोन नैसर्गिक संसाधनांचे अनन्यसाधारण महत्व आहे. शेती, ग्रामीण अर्थव्यवस्था, पर्यावरण आणि मानवी जीवन यांचा थेट संबंध या दोन्ही घटकांशी आहे. त्यामुळे मातीचे संवर्धन आणि पाण्याचे शाश्वत व्यवस्थापन ही केवळ शासनाची जबाबदारी न राहता ती व्यापक लोकचळवळ बनणे ही काळाची गरज आहे. याच विचारातून राज्यात यंदा २१ ऑगस्ट हा 'जलसंधारण दिन' म्हणून साजरा करण्यात येणार आहे. माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त साजरा होणारा हा दिवस त्यांच्या जलसंधारणविषयक दूरदृष्टीला अभिवादन करण्याबरोबरच महाराष्ट्राच्या जलसुरक्षित भविष्यासाठी नव्या संकल्पाची सुरुवात ठरणार आहे. दिवंगत सुधाकरराव नाईक यांनी मुख्यमंत्री म्हणून काम करताना राज्यासमोरील दुष्काळ आणि पाणीटंचाईचे आव्हान केवळ मोठ्या धरणांच्या माध्यमातून सोडविता येणार नाही, हे ओळखले. पावसाचा प्रत्येक थेंब अडविणे, तो जमिनीत मुरविणे आणि स्थानिक पातळीवरील जलस्रोतांचे पुनरुज्जीवन करणे आवश्यक आहे, या भूमिकेतून त्यांनी 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा मूलमंत्र दिला. पाणलोट विकास, भूजल पुनर्भरण, पाझर तलाव, गाव तलाव, नाला बांध, माती बंधारे आणि अन्य छोट्या जलसंधारण संरचनांवर त्यांनी भर दिला. जलसंधारणाला स्वतंत्र प्रशासकीय दिशा देत त्यांनी या विषयाला लोकसहभागाची जोड दिली.

१९९१ ते १९९३ या काळात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी घेतलेले अनेक निर्णय आजही दिशादर्शक ठरतात. ग्रामीण भागातील रोजगार निर्मिती आणि जलसंधारणाची कामे यांची सांगड घालून त्यांनी जलस्रोत निर्मितीला चालना दिली. जलसंधारण हे केवळ अभियांत्रिकीचे काम नसून गावागावातील नागरिकांच्या सहभागातून उभे राहणारे अभियान आहे, ही भूमिका त्यांच्या कार्यातून स्पष्ट झाली. आज जलयुक्त शिवार, भूजल पुनर्भरण, पाणलोट विकास यांसारख्या विविध उपक्रमांमध्ये त्यांच्या विचारांचे प्रतिबिंब दिसून येते. याच योगदानाची दखल घेत दिवंगत सुधाकरराव नाईक यांचा स्मृतिदिन १० मे हा २००३ पासून जलसंधारण दिन म्हणून साजरा केला जात होता. मात्र, स्मृतिदिनाऐवजी जन्मदिवस अधिक उत्साहपूर्ण आणि लोकसहभागातून साजरा व्हावा, या विचारातून मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी विभागातील अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि संबंधित घटकांशी चर्चा करून २१ ऑगस्ट हा दिवस जलसंधारण दिन म्हणून साजरा करण्यासाठी पुढाकार घेतला. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी यास मान्यता दिल्यानंतर शासनाने त्याबाबतचा निर्णय घेतला. त्यामुळे यापुढे दरवर्षी २१ ऑगस्ट हा दिवस महाराष्ट्राच्या जलसंधारण चळवळीचा महत्त्वपूर्ण दिवस ठरणार आहे. यंदाचा जलसंधारण दिन केवळ औपचारिक कार्यक्रमांपुरता मर्यादित न ठेवता त्याला व्यापक जनसहभागाची जोड देण्यात आली आहे. १५ ते २१ ऑगस्टदरम्यान 'जलसंधारण सप्ताह', तर १५ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या कालावधीत 'जलसंधारण अभियान' राबविण्यात येणार आहे. शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संस्था आणि विविध प्रशासकीय यंत्रणांच्या माध्यमातून जलसंधारणाचा संदेश घराघरात पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या अभियानातील सर्वात आकर्षक उपक्रम म्हणजे 'महा वॉकेथॉन




२०२६ - वॉक फॉर वॉटर'. २१ ऑगस्ट रोजी सकाळी राज्यातील सर्व जिल्ह्यांच्या ठिकाणी एकाच वेळी तीन किलोमीटरची महा वॉकेथॉन आयोजित करण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात किमान दहा हजार नागरिकांच्या सहभागाचे उद्दिष्ट असून, राज्यभरातून तीन लाखांहून अधिक नागरिक प्रत्यक्ष सहभागी होण्याची अपेक्षा आहे. नागरिक, युवक-युवती, विद्यार्थी, महिला, लोकप्रतिनिधी, अधिकारी-कर्मचारी, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, 'माय भारत', क्रीडा संस्था, स्वयंसेवी संस्था, उद्योग क्षेत्र, कलाकार आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर या उपक्रमात सहभागी होणार आहेत. ही केवळ चालण्याची स्पर्धा नसून जलसंधारणासाठी जनजागृतीची सामूहिक पावले आहेत. वॉकथॉनच्या प्रारंभी सहभागी नागरिकांकडून मृद व जलसंधारणाची सामूहिक शपथ घेतली जाणार आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब जपणे, मातीची धूप रोखणे, पावसाचे पाणी अडविणे आणि जलस्रोतांचे संवर्धन करणे याबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. 'माती वाचवा, पाणी जपा, सुरक्षित भविष्य घडवा' हा यंदाच्या अभियानाचा मुख्य संदेश आहे. 'पाणी अडवा, पाणी जिरवा, जलयुक्त महाराष्ट्र घडवा' हा संदेशही या चळवळीला दिशा देणार आहे.

**विशेष लेख...**

युवकांचा सहभाग वाढविण्यासाठी डिजिटल माध्यमांचाही प्रभावी वापर करण्यात येणार आहे. 'रील फॉर सॉईल ण्ड वॉटर कन्झर्वेशन' या उपक्रमातून १५ ते ३० वयोगटातील युवक-युवतींना मृद व जलसंधारणाचा संदेश सर्जनशील पद्धतीने मांडण्याची संधी मिळणार आहे. ३० ते ६० सेकंदांच्या इन्स्टाग्राम रिल्सच्या माध्यमातून मातीची धूप, पाणी बचत, पावसाच्या पाण्याचे संकलन, शेततळी, बंधारे, वृक्षारोपण, भूजल पुनर्भरण आणि पर्यावरण संवर्धन यांसारख्या विषयांवर संदेश देता येणार आहे. अभिनय, संगीत, विनोद, लघुपट, निमेशन, कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन दृश्ये किंवा अन्य नाविन्यपूर्ण माध्यमांचा वापर करून युवकांना आपली कल्पकता सादर करता येणार आहे. SaveSoilSaveWater हा अधिकृत हॅशटॅग वापरून राज्यभरातून मोठ्या प्रमाणात रिल्स तयार करण्याचे उद्दिष्ट आहे. जलसंधारणाचा संस्कार पुढील पिढीवर व्हावा यासाठी शाळा आणि महाविद्यालयांमध्येही विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. निबंध, चित्रकला, पोस्टर, वादविवाद स्पर्धा, जलसंधारणाची शपथ, 'एक शाळा-एक शोषखड्डा', जलमित्र किंवा जलदूत घोषित करणे अशा उपक्रमांतून विद्यार्थ्यांना जलसंधारणाशी जोडले जाणार आहे. २१ ऑगस्ट रोजी दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या प्रतिमेस अभिवादन करून त्यांच्या जलसंधारणविषयक कार्याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे. अभियानाच्या कालावधीत ग्रामीण आणि शहरी भागात प्रत्यक्ष जलसंधारणाच्या कामांनाही गती दिली जाणार आहे. विविध योजनांतर्गत कामांचे भूमीपूजन, लोकार्पण आणि जलपूजन, शेततळी व जलस्रोतांची पाहणी, अमृत सरोवरांच्या परिसरात वृक्षारोपण, नाला, तलाव, विहीर आणि पाझर तलावांची लोकसहभागातून स्वच्छता अशा उपक्रमांवर भर दिला जाणार आहे. जलयुक्त शिवार अभियान २.०, गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार, अमृत सरोवर आणि प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना- पाणलोट विकास घटक यांसारख्या उपक्रमांची माहितीही जनतेपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. जलसंधारणाच्या कामात उत्कृष्ट योगदान देणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव, लोकसहभागातून श्रमदान, जलस्रोतांचे संवर्धन आणि जनजागृती या माध्यमातून शासन आणि समाज यांच्यातील सहभाग अधिक दृढ करण्याचा प्रयत्न आहे. प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर समन्वय साधून कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे. आज हवामान बदल, अनियमित पाऊस, वाढते तापमान, भूजल पातळीतील घट आणि पाण्याची वाढती मागणी यामुळे जलसुरक्षेचे आव्हान अधिक गंभीर झाले आहे. अशा परिस्थितीत सुधाकरराव नाईक यांनी दशकांपूर्वी दिलेला 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा संदेश अधिकच महत्त्वाचा ठरतो. जलसंधारणाची कामे किती झाली यापेक्षा ती किती परिणामकारक ठरली, पाणी किती काळ टिकले आणि पुढील पिढीसाठी आपण किती जलसाठा निर्माण केला, हा खरा प्रश्न आहे. मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी या अभियानाच्या माध्यमातून जलसंधारणाला व्यापक लोकचळवळीचे स्वरूप देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. त्यांच्या मते, माती आणि पाणी ही निसर्गाची अमूल्य संपत्ती असून त्यांचे संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नाही, तर प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे.

२१ ऑगस्टचा 'जलसंधारण दिन' त्यामुळे केवळ एका महान नेत्याच्या स्मरणाचा दिवस न राहता महाराष्ट्राच्या जलसुरक्षित भविष्यासाठी सामूहिक संकल्पाचा दिवस ठरला पाहिजे. सुधाकरराव नाईक यांना खरी आदरांजली त्यांच्या प्रतिमेला हार अर्पण करण्यात नाही, तर त्यांच्या विचारांना कृतीची जोड देण्यात आहे. प्रत्येक गावात जलस्रोत जपला, प्रत्येक शेतात पाण्याचा थेंब अडविला, प्रत्येक शाळेत जलसंधारणाचा संस्कार रुजविला आणि प्रत्येक नागरिकाने पाण्याची जबाबदारी स्वीकारली, तरच 'जलसंधारण दिना'चा खरा उद्देश साध्य होईल.

माती वाचली तर शेती वाचेल, पाणी जपले तर जीवन सुरक्षित राहील आणि लोकसहभाग वाढला तर महाराष्ट्र जलसंपन्न बनेल. चला, सुधाकरराव नाईक यांच्या जलसंधारणाच्या विचारांना कृतीची जोड देऊया-'माती वाचवा, पाणी जपा, सुरक्षित भविष्य घडवा!'

**- गजानन पाटील,**
विभागीय संपर्क अधिकारी,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई

## रंजाणे येथील जि.प. शाळेत ८०वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा; ध्वजारोहणाचा मान वडार समाजाला

रंजाणे- धुळे तालुक्यातील रंजाणे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत ८० वा स्वातंत्र्यदिन अत्यंत उत्साहात आणि देशप्रेमाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. यावर्षीच्या स्वातंत्र्यदिनाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे, गावातील वडार समाजाला या ऐतिहासिक दिनी मुख्य ध्वजारोहण करण्याचा बहुमान देण्यात आला. समाज बांधवांच्या हस्ते अत्यंत सन्मानपूर्वक ध्वजारोहण करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धुळे जिल्हा भटक्या विमुक्त जाती-जमाती संघटनेचे अध्यक्ष श्री. राजू सूर्यवंशी होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी उपसरपंच श्री. विश्वदीप राऊळ, रंजाणे विकास सोसायटीचे चेअरमन श्री. महेंद्रसिंग गिरासे, माजी सरपंच श्री. दीपक ठाकरे आणि विद्यमान उपसरपंच श्री. अशोक ठाकरे प्रामुख्याने उपस्थित होते.गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरवकार्यक्रमात शालेय विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले. पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती (स्कॉलरशिप) परीक्षा उत्तीर्ण झालेल्या ५ गुणवंत विद्यार्थ्यांना कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. राजू सूर्यवंशी यांच्या हस्ते प्रत्येकी २०० रुपये रोख बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच श्री. सुभाष वाडिले यांच्याकडून सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना वही आणि पेन भेट देऊन त्यांचा उत्साह वाढवण्यात आला.या राष्ट्रीय सणाला गावातील सर्व शासकीय कर्मचारी, अंगणवाडी सेविका, मदतनीस, ग्रामपंचायत सदस्य आणि रंजाणे ग्रामस्थ मोठ्या



संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन शिक्षकांनी केले, तर उपस्थितांचे आभार मुख्याध्यापक श्री. गणेश गोजरे सर यांनी मानले.

# धुळे जिल्हा कारागृहाच्या सुधारणांसाठी सर्वतोपरी सहकार्य–पालकमंत्री जयकुमार रावल






## जिल्हा कारागृहात प्रशासकीय इमारत व प्रवेशद्वाराचे उदघाटन

धुळे (जिमाका) – ऐतिहासिक आणि अनेक स्वातंत्र्यसैनिकांचे वास्तव्य राहिलेल्या धुळे जिल्हा कारागृहातील सुधारणांसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, असे प्रतिपादन राज्याचे पणन व राजशिष्टाचार तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले. धुळे जिल्हा कारागृहाच्या प्रशासकीय इमारत व प्रवेशद्वार उद्घाटन सोहळा आज दुपारी आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी पालकमंत्री श्री. रावल बोलत होते. यावेळी आमदार राघवेंद्र पाटील, आमदार अनुप अग्रवाल, उपमहापौर ज्योत्स्ना पाटील, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, पोलिस अधीक्षक विशाल आनंद, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता विनोद भदाणे, कार्यकारी अभियंता आर. आर. पाटील, अपर पोलिस अधीक्षक डॉ. अजय देवरे, कारागृह अधीक्षक एकनाथ शिंदे, उप अधीक्षक संदीप एकशिंगे, माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे आदी उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री श्री. रावल यांच्या हस्ते बंदिवानांना स्वातंत्र्य दिनानिमित्त मिठाईचे वाटप करण्यात आले.

पालकमंत्री श्री. रावल म्हणाले की, या कारागृहात अनेक स्वातंत्र्य सैनिक बंदिवान म्हणून होते. याच कारागृहात आचार्य विनोबा भावे यांनी गीताई सांगितली. जिल्हा कारागृहाच्या सुधारणांसाठी मानवतावादी दृष्टिकोन ठेवला जाईल. कारागृहातील बंदिवानांनी कौशल्य आत्मसात करून स्वावलंबी व्हावे. कारागृहाच्या मुख्य प्रशासकीय इमारत व प्रवेशद्वाराचे उद्घाटन झाले. हा प्रकल्प राज्यातील सुधारित व आधुनिक कारागृह व्यवस्थेच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल आहे. कारागृहातील सुधारणांसाठी राज्य शासनाने तत्परतेने निर्णय घेत १४ कोटी ९९ लाख रुपयांचा निधी मंजूर केला. यामुळे कारागृह व्यवस्थेत आधुनिक सुविधा उपलब्ध झाल्या असून, बंदींच्या पुनर्वसनाला नवी दिशा मिळणार आहे, असेही त्यांनी सांगितले. कारागृह अधीक्षक श्री. शिंदे म्हणाले की, धुळे कारागृहाची स्थापना १८६२ मध्ये झाली. या कारागृहात स्वातंत्र्य सैनिक बंदिवान म्हणून होते. या कारागृहात जिल्हा नियोजन समिती व राज्य शासनाच्या माध्यमातून विविध सुविधा निर्माण केल्या जात आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. पाटील यांनी कारागृहात सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सुरू असलेल्या विविध कामांची माहिती दिली. प्रारंभी पालकमंत्री श्री. रावल यांनी परिसराची पाहणी करून समाधान व्यक्त केले.

# ‘मिशन लक्षवेध’मधून धुळे जिल्ह्यातील खेळाडूंना आंतरराष्ट्रीयस्तरावर नेण्याचा संकल्प करावा – पालकमंत्री जयकुमार रावल







## *मिशन लक्षवेधअंतर्गत जिल्हा क्रीडा प्रतिभा विकास केंद्राचे उद्घाटन*

धुळे (जिमाका) – क्रीडा क्षेत्रात धुळे जिल्ह्यासह महाराष्ट्रातील खेळाडूंनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करावी, यासाठी राज्य शासनाच्या ‘मिशन लक्षवेध’ उपक्रमाच्या माध्यमातून गुणवंत खेळाडूंचा शोध घेऊन त्यांना आवश्यक प्रशिक्षण, सुविधा आणि प्रोत्साहन देण्यात येणार आहे. ऑलिम्पिक, आशियाई क्रीडा स्पर्धा आणि राष्ट्रकुल स्पर्धांमध्ये महाराष्ट्रातील खेळाडूंनी पदके मिळवावीत, यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले.

जिल्हा क्रीडा संकुल, धुळे येथे ‘मिशन लक्षवेध’ योजनेंतर्गत जिल्हा क्रीडा प्रतिभा विकास केंद्राचे उद्घाटन पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते आज करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.यावेळी महापौर मायादेवी परदेशी, आमदार राघवेंद्र पाटील, आमदार अनुपभैय्या अग्रवाल, उपमहापौर ज्योत्सना पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, दोंडाईचा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण पाटील, उपविभागीय अधिकारी रोहन कुवर, जिल्हा क्रीडा अधिकारी मनोहर पाटील, विविध खेळांचे प्रशिक्षक, क्रीडा संघटनांचे पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने खेळाडू उपस्थित होते. पालकमंत्री श्री. रावल म्हणाले, भारताला क्रीडा क्षेत्राची समृद्ध परंपरा लाभली आहे. कुस्ती, कबड्डी यांसारखे अनेक खेळ भारतीय मातीत विकसित झाले आहेत. देशाने विविध क्षेत्रांत मोठी प्रगती केली असली, तरी क्रीडा क्षेत्राला अपेक्षित गती देण्यासाठी अजून मोठ्या प्रमाणावर प्रयत्नांची आवश्यकता आहे. दहावी–बारावीनंतर विद्यार्थ्यांचा मैदानाशी संपर्क कमी होत आहे. परदेशात क्रीडेला शिक्षणाइतकेच महत्त्व देऊन लहान वयापासूनच व्यायाम आणि क्रीडेला जीवनाचा अविभाज्य भाग मानले जाते. भारतातही क्रीडेला शिक्षणाइतकेच महत्त्व देऊन खेळाडूंना मैदान, क्रीडा साहित्य, दर्जेदार प्रशिक्षण आणि स्पर्धांच्या पुरेशा संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

‘मिशन लक्षवेध’चा प्रमुख उद्देश लहान वयातील गुणवंत खेळाडूंचा शोध घेणे, त्यांच्या क्रीडा कौशल्याचा विकास करणे आणि त्यांना दर्जेदार प्रशिक्षण व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे हा आहे. ॲथलेटिक्स, आर्चरी, बॅडमिंटन, बॉक्सिंग, हॉकी, कुस्ती, वेटलिफ्टिंग, शूटिंग, रोइंग, सेलिंग, टेबल टेनिस आणि लॉन टेनिस अशा विविध खेळांना या उपक्रमातून खेळाडूंना प्रोत्साहन दिले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. खेळाडूंनी आपल्या ध्येयावर पूर्ण लक्ष केंद्रित केले पाहिजे. मोबाईल, दूरदर्शन किंवा इतर कारणांमुळे ध्येयापासून विचलित होता कामा नये. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीयस्तरावर पोहोचण्याचे स्वप्न प्रत्येक खेळाडूने बाळगून त्यासाठी सातत्याने मेहनत घेतली पाहिजे. खेळाडूंना क्रीडा साहित्य, प्रशिक्षण, प्रशिक्षक आणि दर्जेदार मैदानांच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन व लोकप्रतिनिधींनी समन्वयाने काम करावे. जिल्ह्यातील मोठ्या कंपन्यांच्या सीएसआर निधीतून क्रीडा क्षेत्रासाठी आवश्यक सुविधा उभारण्यावर भर देण्यात येईल, असे पालकमंत्री श्री.रावल यांनी सांगितले.

क्रीडा क्षेत्रासाठी उपलब्ध होणाऱ्या निधीचा आणि साहित्याचा योग्य वापर होणे आवश्यक आहे. खेळाडूंची निवड गुणवत्तेच्या आधारावरच झाली पाहिजे. एखाद्या खेळाडूच्या भवितव्यावर अधिकाऱ्यांच्या निर्णयांचा मोठा परिणाम होत असतो. त्यामुळे खेळाडूंशी सकारात्मक संवाद साधून त्यांना प्रोत्साहन देण्याची भूमिका प्रशासनाने ठेवावी. धुळे जिल्ह्यातील खेळाडूंनी जिल्हा व राज्य पातळीपलीकडे जाऊन देशाचे प्रतिनिधित्व करावे आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदके मिळवावीत, अशी अपेक्षा पालकमंत्री रावल यांनी व्यक्त केली. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचणाऱ्या जिल्ह्यातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक नियोजन करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने प्रत्येक खेळाडूने ‘खेळाच्या माध्यमातून भारताचे नाव जगभरात मोठे करीन’, असा संकल्प करावा, असे आवाहन त्यांनी केले.

# आर.सी.पटेल शैक्षणिक संकुलाचा शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय ठसा ; ३६८ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक

शिरपूर – आर.सी. पटेल शैक्षणिक संकुल, शिरपूर अंतर्गत विविध माध्यमिक व प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. इयत्ता चौथी व सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षा २०२५–२६ च्या अंतिम निकालात संकुलातील विद्यार्थ्यांनी दमदार यश संपादन केले आहे. इयत्ता चौथीच्या प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेसाठी संकुलातील १४८२ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ११२६ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले असून, पात्रतेची टक्केवारी ७६ टक्के आहे. यामध्ये १४५ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव सौ. रेशा पटेल, सर्व ट्रस्टी, सीईओ डॉ. उमेश शर्मा, सर्व शाळांचे प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक, पालक यांनी अभिनंदन केले आहे. इयत्ता सातवीच्या उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत २०५६ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी तब्बल १८७० विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले. याची टक्केवारी ९१ टक्के असून, २२३ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले आहेत.

# दुष्काळमुक्त महाराष्ट्राचा संकल्प पूर्ण करणार–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस
# भारताच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनाचा मंत्रालयात ध्वजारोहण समारंभ

धुळे (जिमाका) – विकसित भारताच्या संकल्पनेत महाराष्ट्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून महाराष्ट्र हे देशाच्या विकासाचे 'ग्रोथ इंजिन' आहे. महाराष्ट्राचा विकास करताना शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचविण्यासोबतच महाराष्ट्राला कायमस्वरूपी दुष्काळमुक्त करण्याचा राज्य शासनाचा संकल्प आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले. स्वातंत्र्यसंग्राम सेनानी, क्रांतिकारक तसेच देशाच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या जवानांना अभिवादन करून मुख्यमंत्र्यांनी राज्यातील जनतेला स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. मंत्रालय येथे भारताच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त झालेल्या मुख्य शासकीय समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले, याप्रसंगी ते बोलत होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने गेल्या बारा वर्षांत जगातील चौथ्या क्रमांकाची मोठी अर्थव्यवस्था होण्याचा टप्पा गाठला असून २५ कोटी नागरिकांना गरिबीतून बाहेर काढण्यात देशाला यश आले आहे. विकसित भारत म्हणजे केवळ विकसित अर्थव्यवस्था नव्हे, तर दीन–दलित, गोरगरीब, आदिवासी, शेतकरी, शेतमजूर आणि महिलांसह समाजातील प्रत्येक घटकाच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडविणे होय, असे मुख्यमंत्री म्हणाले. महाराष्ट्र देशातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेले राज्य असून यंदाच्या पहिल्या सहामाहीतील राज्याचा आर्थिक विकासदर जवळपास ८.८ टक्के असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येक जिल्हा विकासाचे 'ग्रोथ इंजिन' बनविण्याचा शासनाचा प्रयत्न असून आतापर्यंत जवळपास १३ जिल्ह्यांनी निर्धारित लक्ष्य पूर्ण केले आहे. गडचिरोली, पालघर, नंदुरबार यांसह राज्यातील प्रत्येक भागात विकास पोहोचविण्यास शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

संविधानाने नागरिकांना अधिकार दिले आहेत, त्याचबरोबर कर्तव्यांची जाणीवही करून दिली आहे. त्यामुळे स्वातंत्र्यदिनी सर्व नागरिकांनी आपल्या कर्तव्यांचे भान ठेवून देशाचा तिरंगा सदैव उंच राहील, असा संकल्प करावा, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले. शेतकऱ्यांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना राबविण्यात येत असून ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी देण्यात येत आहे. शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध करून देण्याच्या दिशेनेही मोठी प्रगती झाली असून सध्या ७६ टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळत आहे. पुढील वर्षभरात १०० टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्याचा संकल्प पूर्ण करण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. महाराष्ट्राच्या मागील पिढ्यांनी दुष्काळ पाहिला; मात्र येणाऱ्या पिढीला दुष्काळ पाहावा लागू नये, यासाठी नदीजोड प्रकल्पांच्या माध्यमातून मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र तसेच पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी भागात पाणी पोहोचविण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. त्यातून महाराष्ट्र कायमस्वरूपी दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प असल्याचे त्यांनी नमूद केले. महिला शेतकरी कायदा तयार करून महिलांना शेतकऱ्याचा दर्जा देण्याचा निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. महिलांसह समाजातील वंचित घटकांच्या विकासासाठी लक्षित योजना राबवून सर्वांना सोबत घेऊन विकास साधण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्रातील युवकांना जागतिक दर्जाचे शिक्षण मिळावे यासाठी 'एज्युसिटी'च्या माध्यमातून परदेशी विद्यापीठांना राज्यात आणले जात आहे. राज्यातील विद्यापीठांचा दर्जा उंचावण्यासोबतच आधुनिक आणि 'कटिंग–एज' शिक्षण उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. महाराष्ट्र देशाचे 'स्टार्टअप कॅपिटल' बनले असून राज्यात सर्वाधिक गुंतवणूक आणि परकीय गुंतवणूक होत आहे. त्यामुळे युवकांसाठी रोजगाराच्या मोठ्या प्रमाणावर संधी निर्माण होत असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. 'देशाच्या प्रगतीत आजही महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे आणि भविष्यातही देशाच्या प्रगतीचा सर्वात मोठा वाटेकरी महाराष्ट्र असेल,' असा विश्वास व्यक्त केला. ध्वजारोहणानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी उपस्थित प्रशासकीय अधिकारी, सेनादलाचे अधिकारी, निमंत्रित नागरिक यांची भेट घेऊन शुभेच्छा दिल्या. यावेळी कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, मुंबईच्या महापौर रितू तावडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पोलीस महासंचालक सदानंद दाते, राजशिष्टाचार सचिव राजेश गवांदे, मुख्यमंत्र्यांच्या पत्नी अमृता फडणवीस, मंत्रालयीन विभागांचे प्रमुख, तिन्ही सेनादलांचे प्रमुख अधिकारी, शासकीय अधिकारी –कर्मचारी आणि निमंत्रित नागरिक उपस्थित होते. मुख्य ध्वजारोहण समारंभानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी मंत्रालयातील छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, यांच्या प्रतिमांना वंदन करून पुष्पहार अर्पण केले.

## वडार समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर मंत्रालयातील बैठक आशादायी ठरणार
## वडार समाजाच्या न्याय हक्कांसाठी सातत्याने पाठपुरावा करण्याचा नेत्यांचा निर्धार!



मुंबई– दि. १२ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी २: ४५ वाजता वडार समाजाच्या प्रलंबित प्रश्नांवर आणि सर्वांगीण उद्धारासाठी मुंबईतील मंत्रालयात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दालनात एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत समाजाच्या विविध अडचणींवर सकारात्मक चर्चा करण्यात आली.या बैठकीला 'मी वडार महाराष्ट्राचा' संघटनेचे अध्यक्ष विजय चौगुले, वडार एकता परिषदेचे तथा अभ्यासक भरत विटकर,वर्धाचे जिल्हाध्यक्ष सुरज पिटेकर,शिवसेना ओबीसी बारा बलुतेदार विभागाचे सोशल मीडिया राज्यप्रमुख संजय कुसळकर, कार्याध्यक्ष सुरेश धोत्रे, उपाध्यक्ष शंकर चौगुले, राजू धोत्रे, राजेश अलकुंटे, यशवंत लष्करे, सुधीर पवार, राजू सांडू, रामू लष्कर, विठ्ठल कासवकर, यल्लाप्पा कुसळकर, प्रकाश पवार, चंदू पवार, राजु सुर्यवंशी, राजू लष्कर, नितीन पिटेकर, महेश मंजुळकर, कैलास देवतळे, शंकर धोत्रे, दिलीप गुंजाळ, शिवाजी ननवरे आदि उपस्थित होते. तसेच वर्धाचे जिल्हाधिकारी दृक्श्राव्य (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) माध्यमातून आणि महसूल विभागाचे वरिष्ठ अधिकारीही या बैठकीला जोडले गेले होते.बैठकीतील प्रमुख मागण्या:ङ्ग पुरावा शिथिल करणे: वडार समाजाच्या जात वैधता प्रमाणपत्रासाठी आवश्यक असलेली १९६१ च्या पुराव्याची अट शिथिल करावी. रॉयल्टी मर्यादा वाढवणे: पारंपरिक दगड उत्खनन व वाहतुकीसाठी मिळणारी २०० ब्रास रॉयल्टीची मर्यादा वाढवून ती ५०० ब्रास करण्यात यावी.ङ्ग अतिक्रमण नियमानुकूल करणे: वडार समाजातील नागरिकांची झालेली अतिक्रमणे शासनाने नियमानुकूल करावीत.

रोजगार संधी: समाजातील बेरोजगार तरुणांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करून द्याव्यात.या बैठकीत महसूल विभागाशी संबंधित स्थानिक समस्या आणि इतर प्रलंबित प्रश्नांवरही मंत्र्यांचे लक्ष वेधण्यात आले. या मागण्या केवळ कागदावर न राहता त्यावर शासनस्तरावर तातडीने व सकारात्मक कार्यवाही व्हावी, यासाठी संघटना आणि समाज नेत्यांच्या वतीने सातत्याने पाठपुरावा करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. वडार समाजाच्या हक्कांसाठी संघटित प्रयत्नांची दिशा मजबूत करणारी ही बैठक अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली असून सर्व प्रलंबित मागण्या वर मार्ग काढण्याचे प्रयत्न करू असे समाधानकारक आश्वासन यावेळी महसुल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी वडार समाज बांधवाना दिले आहे

## वडार समाजाचे डॉ. विनायक लष्कर यांचा अल्पपरिचय

पुणे – विनायक लष्कर हे अनेकांत एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,बारामती, पुणे येथे समाजशास्त्र विभाग प्रमुख आहेत. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात 'विमुक्त आणि भटक्या जमातींच्या स्वतंत्र अभ्यास केंद्राच्या' स्थापनेवरील तज्ञ समिती सदस्य म्हणून काम केले आहे. ईकोनेट– पुणे, यशदा– पुणे, आणि टाटा समाज विज्ञान संस्था– मुंबई या संस्थांनी भटक्या विमुक्त जाती जमाती संदर्भात केलेल्या संशोधन प्रकल्पामध्ये सल्लागार काम केले आहे. तसेच सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे, सोपेकॉम, पुणे आणि प्रयास (साधन आणि संसाधन गट) पुणे, निसदा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, या संस्थांच्या संशोधन प्रकल्पामध्ये संशोधन सहाय्यक म्हणून काम केले आहे. विनायक लष्कर यांनी भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाच्या 'विमुक्त, भटक्या आणि अर्ध–भटक्या जमातींसाठीच्या राष्ट्रीय आयोगाचे



तज्ञ समिती सदस्य म्हणून काम केलेले आहे. भटक्या विमुक्त जाती जमाती अभ्यास केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांच्या अभ्यास मंडळावर काम केले आहे. तसेच तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागाच्या अभ्यास मंडळाचे प्रमुख आणि तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या विद्या परिषदेवर देखील सदस्य म्हणून काम करत आहेत. विनायक लष्कर हे गेल्या २० वर्षापासून भटक्या विमुक्त जाती जमातींच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय प्रश्नांवर सातत्यपूर्ण काम करत आहे. संशोधन, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवरील नियतकालिकांमध्ये लिखाण, धोरण निर्मिती, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवरील संमेलने आणि कार्यशाळा यामध्ये सक्रिय सहभागी होऊन भटक्या विमुक्तांच्या प्रश्नांना अधोरेखित करण्याचे काम करत आहेत. 'वडार समाज– समाजशास्त्रीय अभ्यास' या त्यांच्या पुस्तकास दीनमित्रकार मुकुंदराव पाटील स्मारक समितीमार्फत दिला जाणारा २०१५ चा 'सत्यशोधक दीनमित्रकार मुकुंदराव पाटील साहित्य पुरस्कार – २०१५' मिळाला आहे. तसेच त्यांच्या 'वडार समाज : समाजशास्त्रीय अभ्यास' या पुस्तकास मातंग साहित्य परिषदेमार्फत दिला जाणारा २०२४ सालचा 'साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे वाङ्मय पुरस्कार– २०२४' देखील प्राप्त झाला आहे. तसेच त्यांच्या 'विमुक्ती कोलाहल' या काव्यसंग्रहास २०२५ सालचा 'साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे वाङ्मय पुरस्कार– २०२५' देखील प्राप्त झाला आहे. तसेच भटक्या विमुक्त जाती जमातींच्या उत्थाना संदर्भात करत असलेल्या कार्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील 'युवा गौरव पुरस्कार २०२२' ने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

## मुकेश आर. पटेल इंग्लिश मीडियम स्कूल, शिरपूर येथे आदिवासी दिवस आणि क्रांती दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा

शिरपूर – मुकेश आर. पटेल इंग्लिश मीडियम स्कूल, शिरपूर येथे मुख्याध्यापिका स्मिता पंचभाई आणि उपमुख्याध्यापिका ममता न्याती यांच्या मार्गदर्शनाखाली आदिवासी दिवस आणि क्रांती दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, स्वातंत्र्यसैनिकांविषयी आदर, आदिवासी संस्कृतीची ओळख आणि सामाजिक मूल्यांची जपणूक निर्माण करण्याच्या उद्देशाने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला शिक्षक–पालक समितीच्या सौ. रुपाली राजपूत, सौ. दीपिका जाधव, सौ. दीपाली देवरे आणि सौ. नम्रता पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध स्वातंत्र्यसैनिक व राष्ट्रपुरुषांच्या वेशभूषेत प्रभावी भूमिका साकारल्या. कियांश चव्हाण– भगतसिंग, मितेश राजपूत – नेताजी सुभाषचंद्र बोस, दिव्यांका राजपूत –झाशीची राणी लक्ष्मीबाई, जयांश जाट – चंद्रशेखर आझाद, अद्वैत देशमुख –लोकमान्य टिळक आणि प्रणीत गिरासे – डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका साकारून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

शीतल खोरे आणि पूनम देवरे यांनी क्रांती दिन व आदिवासी दिवसाचे ऐतिहासिक महत्त्व, त्यामागील उद्देश तसेच देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदान याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

हे मराठी साप्ताहिक, प्रकाशक संजय अण्णा कुसळकर यांनी मुद्रक अब्दुल मलिक मोहम्मद शरीफ अन्सारी यांच्या न्यू शार्प ऑफसेट प्रिंटर्स, अप्सरा हॉटेल, नवीन बस स्टॅण्ड समोर, मालेगांव, जि. नाशिक येथे छापून सा. 'प्रजा न्याय' कार्यालय – घर नं. २६, चक्करबर्डी, शासकीय दूध डेअरी रोड, पाण्याच्या टाकीजवळ, धुळे – ४२४ ००१ येथून प्रकाशित केले आहे. संपादक, मालक, संजय अण्णा कुसळकर – भ्रमणध्वनी – ९४२२७९८०९३ / ९०२८१३६९५३. Email - kusalkars@gmail.com / prajanyay@gmail.com (कायदेशीर सल्लागार – ॲड. उमेश विठ्ठल सुर्यवंशी)
(या वृत्तपत्रातील लिखानाशी मालक/प्रकाशक/संपादक सहमत असतीलच असे नाही.) (कोणताही वाद धुळे न्यायालयांतर्गत)